**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १२१३/२०२५**

**निशाणी क्रमांकः– १४ खाली**

**संदिप चेट्टीयार व इ. वि. कोणीही नाही.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नावः– राजेंद्र सुंदर चेट्टीयार

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्री. राजेश मोतेवाड यांचे मार्फत सुरू**

०१. सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. या प्रकरणातील अर्जदार माझे भाऊ आहेत व त्यांनी मला सदर प्रकरणात साक्ष देण्याकरीता पॉवर ऑफ अटर्णी दिली आहे. त्या पॉवर ऑफ अटर्णी ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१५** देण्यात येत आहे. अर्जदारांच्या वडिलांच्या मृत्यु प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. त्यास **अर्टीकल अ** देण्यात येत आहे. अर्जदारांच्या आईच्या मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.१६** देण्यात येत आहे. अर्जदारांच्या वडिलांना इंडियन रेल्वे वेलफेअर ऑर्गनायजेशन यांनी फ्लॅट अॅलॉट केल्याबाबत दिलेले मुळ पत्र मी सोबत आणले आहे व त्याची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१७** देण्यात येत आहे. अर्जदाराच्या वडिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या साठेकराराची मुळ प्रत मी सोबत आणली आहे व झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१८** देण्यात येत आहे. अर्जदारांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या दोन्ही मालमत्तांच्या शेअर सर्टीफिकेटच्या झेरॉक्स प्रती मी दाखल केल्या आहेत व मुळ प्रमाणपत्र सोबत आणले आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिल्या त्या बरोबर आहेत. झेरॉक्सला **नि.१९** देण्यात येत आहे.

०२. दैनिक वादळवारा या पेपरमध्ये दि.०७/१०/२०२५ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल ब** देण्यात येत आहे. दैनिक जनखुलासा या पेपरमध्ये दि.३०/१०/२०२५ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल क** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.04.08 15:39:14 +0530

**(आर. वाय.खंडारे)**

**ठिकाणः पनवेल**
**दिनांकः– ०८/०४/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**